# कार्यालय नागपूर महानगरपालिका,नागपूर.

(स्थावर विभाग)

**नागपूर महानगरपालिकेच्या स्थावर विभागाच्या अंतर्गत स्थावर व जाहिरात विभाग या दोन विभागाचे कामे अंतर्भुत आहेत.**

**स्थावर विभाग :—** नागपूर महानगरपालिकेमधे या विभागा अंतर्गत ना.म.पा. च्या मालमत्तेची नोंद ठेवणे व सार्वजनिक उपयोगाचे कामांना जागा उपलब्ध करुन देणे इत्यादी महत्वाची कामे आहेत. तसेच महानगरपालिकेमध्ये विहीत असलेली व म.न.पा.च्या मालकी हक्काची स्थायी मालमत्ता जसे शाळा, दवाखाने, समाजमंदीर, रस्ते, उद्याने, ऑडीटोरियम, अग्निशमन कार्यालये, म.न.पा. झोनल कार्यालये, ना.सु.प्र. कडून हस्तांतरण झालेले अभिन्यास, विविध अभिन्यासातील हस्तांतरीत झालेल्या मोकळया जागा तसेच विविध प्रयोजनासाठी भुसंपादन केलेली मालमत्ता इत्यादींची नोंद व अभिलेखे ठेवणेबाबतची कार्यवाही या विभागाव्दारे करण्यात येते.

**<u>नागपूर महानगरपालिकेच्या भाडेपट्टयावरील भुखंड/जमिनी बाबत.</u>**

नागपूर महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीचे एकुण २१ अभिन्यास (यादी सोबत संलग्न आहे) तसेच औद्योगीक क्षेत्रामधेही म.न.पा. च्या मालकीचे भुखंड आहेत. एकुण भुखंडाची संख्या ३,७३४ आहे. नागपूर महानगरपालिकेने रहिवासी भुखंड, औद्योगिक स्वरुपाचे भुखंड/जमिनी ज्या ३० वर्षीय भाडेपट्ट्यावर देण्यात आलेले आहेत, महानगरपालिकेच्या अद्यावत ठराव क्र. ३३६ दिनांक २५.११.२००८ व ३७३ दि. १०.०२.२००९ अन्वये आवश्यक शुल्क वसुल करुन कार्यवाही करण्यात येते. म.न.पा. उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने सफाई गल्लीची जागा स्थायी भाडेपट्ट्यावर देण्याबाबत म.न.पा. सभागृहाव्दारे ठराव मंजुर करण्यात आलेला असुन म.न.पा. च्या स्वत:च्या मालकीच्या ४ अभिन्यासातील सफाई गल्ल्या स्थायी भाडेपट्ट्यावर देण्याकरीता शासनाची मंजुरी प्राप्त झालेली आहे. नागपूर शहरातील म.न.पा. ला हस्तांतरीत झालेल्या इतर अभिन्यासातील सफाई गल्ल्या लगतच्या भुखंड धारकांना ३० वर्षीय स्थायी भाडेपट्ट्यावर देण्याबाबत म.न.पा. सभागृहाने सुधारीत ठराव पारित केला असुन, शासनास पाठविण्यात आला आहे. सध्या प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे. यापुर्वी शासनाकडुन सफाई गल्ल्या स्थायी भाडेपट्ट्यावर देण्याकरीता प्राप्त झालेल्या मंजुरीनुसार प्रस्तावास मंजुरी देणे सुरु आहे.

# कार्यालय नागपूर महानगरपालिका,नागपूर

(स्थावर विभाग)

## नागपूर महानगरपालिकेच्या अधिनस्त असणाऱ्या अभिन्यासाची यादी

| अ. क्र. | अभिन्यासाचे नांव | मौजा | एकूण भुखंड |
|---|---|---|---|
| १ | नविन धरमपेठ | धरमपेठ | ९८ |
| २ | जुने धरमपेठ | धरमपेठ | १४३ |
| ३ | न्यु कॉलनी | वडपाकड | २६ |
| ४ | नवी वस्ती | वडपाकड | ६६ |
| ५ | कॉग्रेस नगर | धंतोली | ७१ |
| ६ | गीता ग्राउंड व महाराजबाग रोड, सिताबर्डी (9+6) | सिताबर्डी | १५ |
| ७ | जाट तरोडी | जाट तरोडी | ६८ |
| ८ | ईमामवाडा | जाट तरोडी | ५४ |
| ९ | बारसेनगर—चिमाबाईपेठ | हंसापुरी | ३४७ |
| १० | शिवनगर | नागपूर | ३३२ |
| ११ | कार्पोरेशन कॉलनी | अंबाझरी | १५३ |
| १२ | महाल,इतवारी | नागपूर | २६ |
| १३ | नविन फुटाळा | तेलंगखेडी | २६५ |
| १४ | शिवाजीनगर, भुतेश्वर नगर | नागपूर | १५६२ |
| १५ | ग्रेनगंज (स्मॉल फॅक्टरी एरीया), | नागपूर, | २२ |
| | **स्विपर क्वाटर्स** | | |
| १६ | वाल्मीकी नगर | गाडगा | ४५ |
| १७ | बेझनबाग | इंदोरा | ५० |
| १८ | ठक्करग्राम | हंसापुरी | २०६ |
| १९ | यंदलवाडी | हंसापुरी | ७२ |
| २० | गंगाबाई घाट | नागपूर | ११२ |
| २१ | निको सिरॅमिक | | १ |
| | | **एकूण** | **३७३४** |

## —: जाहिरात विभाग :—

नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीत विविध प्रकारच्या जाहिराती लावण्याकरीता म.न.पा. आऊटडोअर ॲडव्हरटायजिंग पॉलिसी २००१ (शुध्दीकरण आवृत्ती २००६) मा. उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार मंजुर करण्यात आलेली असून सदर्हु पॉलिसीच्या अधीन राहुन जाहिरात विभागाचे कामकाज करण्यात येते. त्यामधे प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश होतो.

**अ) <u>म.न.पा. मालमत्तेवरील जाहिरात फलक</u> :—**

म.न.पा. मालमत्तेवर विभागाव्दारे जाहिरात फलकांकरीता वेळोवेळी निविदा काढुन जाहिरात फलक उभारण्याकरीता परवानगी देण्यात येते.

**ब) <u>स्थायी/अस्थायी खाजगी जाहिरात करण्याचे अधिकार देणे</u> :—**

नागपूर शहरातील खाजगी व शासकीय ईतर मालमत्तेवरील (म.न.पा. मालमत्ता वगळुन) जाहिरात फलक असुन स्थायी/अस्थायी जाहिरात फलकांवर देखरेख/नियंत्रण व परवानगी देण्याचे काम सर्व झोनचे सहा. आयुक्त/वार्ड अधिकारी यांना सोपविण्यात आले आहे.

**क) <u>प्रथम शोधकर्ता (First Finder) तत्वावर जाहिरात करण्याचे अधिकार देणे</u> :—**

प्रथम शोधकर्ता या धोरणावर म.न.पा. मालमत्तेवर जाहिरात प्रथम शोधुन काढणाऱ्यास ३ वर्षाकरीता परवानगी देण्यात येते. तीन वर्षानंतर संबंधीत जाहिराती स्ट्रक्चर सहित म.न.पा. ला हस्तांतरीत कराव्या लागतात व तद्नंतर या जाहिराती निविदेव्दारे वाटप करण्यात येते.

**ड) <u>नविन प्रकारच्या जाहिराती (New Innovative Media Policy) तत्वावर जाहिरात करण्याचे अधिकार देणे:</u>**

या धोरणावर प्रथमतः जाहिरातीचे माध्यम शोधुन काढणाऱ्यास परवानगी देण्यात येते. तीन वर्षानंतर संबंधीत जाहिराती स्ट्रक्चर सहित म.न.पा. ला हस्तांतरीत कराव्या लागतात व तद्नंतर या जाहिराती निविदेव्दारे वाटप करण्यात येते.

म.न.पा. आऊटडोअर ॲडव्हरटायजिंग पॉलिसी २००१ मधील तरतुदीनुसार खालील प्रमाणे नविन प्रकारच्या जाहिरातीस परवानगी देवुन विभागाचे उत्पन्न वाढविण्यास विभाग प्रयत्नशिल आहे.

१. नागपूर शहरात अनेकवेळा धार्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षनिक व ईतर अनधिकृत अस्थायी जाहिरात फलक लावण्यात येत असतात. या अनधिकृत जाहिरात फलकांवर आळा घालण्याचे दृष्टीने म.न.पा. व्दारे शहरात विविध ठीकाणी एकुण ५५० बॅनर स्टॅन्ड उभारुन त्यावर जाहिरात

करण्याचे अधिकार निविदेव्दारे देण्यात आले आहे. त्यावर धार्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षनिक व ईतर जाहिराती करण्यात येत असुन आवश्यकतेनुसार म.न.पा. व्दारे जन कल्याणार्थ जाहिराती सुध्दा करण्यात येतात.

१. Installation Of Temperature, Humidity & Pollution Monitoring Display Board, Along with Advertisement Rights On Squares or Prominent Locations In Nagpur City On B. O. T. तत्वावर निविदेव्दारे नागपूर शहरात विविध ठीकाणी चौकामधे जाहिराती परवानगी देण्यात आलेली आहे.

२. अॅडव्हरटायझींग एजेंसी यांना मोबाईल डिसप्ले व्हॅनवर जाहिरात फलक उभारून त्यावर जाहिरात करण्याकरीता परवानगी देण्यात आलेली आहे.

३. नागपूर शहरात विविध चौकातील ट्रॅफीक रोटरी व ट्रॅफीक आयलॅन्ड (Traffic rotaties & Traffic island) चे विकास/सौंदर्यीकरण व रखरखाव करण्याचे अटीवर जाहिरात करण्याकरीता बि.ओ.टी. तत्वावर निविदेव्दारे नागपूर शहरात विविध ठीकाणी चौकामधे जाहिराती परवानगी देण्यात आलेली आहे.

४. निविदेव्दारे एजेन्सी नियुक्त करुन त्या ऐजन्सीव्दारे संपूर्ण नागपूर शहरातील शॉप बोर्ड बाबत सर्व्हे करुन त्यानुसार देयक देणे व वसुली करण्यात येत आहे.

५. मन्युष्याव्दारे जाहिरात बोर्ड वाहुन जाहिरात करण्यासंबंधात परवानगी देण्यात आलेली आहे.

**शो टॅक्स** : —

नागपूर शहरातील सध्या सुरु असलेल्या एकुण २३ सिनेमा गृहापासुन म.न.पा. ला शो टॅक्स व्दारे उत्पन्न प्राप्त होते.

# कार्यालय नागपूर महानगरपालिका,नागपूर.

( स्थावर विभाग )

## स्थावर विभागातील आस्थापनेबाबत माहीती :—

| अ. क्र. | पदनाम | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | स्थावर अधिकारी | १ | ० | १ |
| २ | कनिष्ठ अभियंता | २ | २ | ० |
| ३ | स्थापत्य अभि. सहायक | ५ | ४ | १ |
| ४ | टंक लिपीक | १ | ० | १ |
| ५ | कनिष्ठ लिपीक | ४ | ४ | ० |
| ६ | मोहरीर | ३ | १ | २ |
| ७ | रेखानुरेखक | १ | ० | १ |
| ८ | दप्तरी | १ | ० | १ |
| ९ | खलासी | ८ | ५ | ३ |
| १० | चपराशी | ३ | ३ | ० |
| | **एकूण** | **२९** | **१९** | **१०** |

## सद्या विभागात कार्यरत अधिकारी कर्मचारी

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. जी. डी. जांभुळकर | स्थावर अधिकारी | |
| २ | श्री. आर. व्ही. मुळे | शाखा अभियंता | |
| ३ | श्री. एस. के. आवारे | शाखा अभियंता | |
| ४ | श्री. ए. वाय. नैताम | कनिष्ठ अभियंता | |
| ५ | श्री. आर. ए. सोनटक्के | स्थापत्य अभि. सहा. | |
| ६ | श्रीमती डी. एस. श्रीराव | स्थापत्य अभि. सहा. | |
| ७ | श्री. एस. आर. मांढरे | स्थापत्य अभि. सहा. | |
| ८ | श्री. व्ही. जे. कोकर्डे | स्थापत्य अभि. सहा. | |
| ९ | श्री. एन. एस. मंथनवार | स्थापत्य अभि. सहा. | |
| १० | श्री. टी. के. टाकळखेडे | निरिक्षक | |
| ११ | श्री. एच. आर. गेडाम | अनुरेखक | |
| १२ | श्री. सी. एम. बागल | कनिष्ठ लिपिक | |
| १३ | श्रीमती एस. जे. पाठक | कनिष्ठ लिपिक | |
| १४ | श्री. एन. डी. राठोड | मोहरीर | |
| १५ | श्री. बी. एस. माहुर्ले | कनिष्ठ लिपिक | |
| १६ | श्री. पि. टी. बारई | लेबॉर्टरी असिस्टंट | |
| १७ | श्री. पी. पी. टिंगणे | लेबॉर्टरी असिस्टंट | |
| १८ | श्री. के. एस. तळेकर | चपराशी | |
| १९ | श्री. एस. पी. रीतपूरकर | चपराशी | |
| २० | श्री. एल. के. भिवगडे | चपराशी | |
| २१ | श्री. जी. आय. जैन | खलाशी | |
| २२ | श्री. एस. एम. रामटेके | खलाशी | |
| २३ | श्री. एस. के. टेकाम | खलाशी | |
| २४ | श्री. व्ही. आर. दुधे | मजदुर | |